# मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई

## -: प्रेस नोट :-

### ISKCON मंदिर, खारघर येथील तीन दानपेटयांमधील रोख रक्कम चोरी करणाऱ्या बांग्लादेशी घुसखोर सराईत गुन्हेगारांना नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेच्या पोलीसांकडून अटक सुमारे ८० हजार रोख रक्कम व इतर मुद्देमाल हस्तगत.

---

- नवी मुंबई खारघर येथील प्रसिध्द ISKCON मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम चोरीचा गंभीर गुन्हा दि.३१/०१/२०२२ रोजीचे रात्रौ घडल्याने मा. पोलीस आयुक्त, श्री बिपीन कुमार सिंग, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. जय जाधव व मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री महेश घुर्ये, यांनी सदरची बाब ही अतिशय गंभीर, संवेदनशिल व नागरिकांचे भावनेशी निगडीत असल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुशंगाने गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त, श्री सुरेश मेंगडे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री विनायक वस्त यांनी विशेष मोहीम राबवून गुन्हा उघडकीस आणण्याबाबत आदेश केले होते. मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजयसिंह भोसले व सुनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा समांतर तपास चालु असताना,
- मध्यवर्ती कक्षाचे सपोनि गंगाधर देवडे यांना ISKCON मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम चोरी करणारे सराईत आरोपीबाबत खात्रीशिर गोपनीय माहिती मिळाल्याने मध्यवर्ती कक्षाचे अधिकारी/अंमलदार यांनी ओवे गाव, कॅम्प परिसर, खारघर येथे दि.१४/०२/२०२२ रोजी सापळा लावून इसम नामे १) राजू फरहात शेख, वय २६ वर्षे, **मुळगाव-** पेरवली, ठाना/जिल्हा कालियॉ, राज्य नराईल, देश - बांग्लादेश व २) अमिरूल उर्फ आकाश मन्नन खान, वय २३ वर्षे, **मुळगाव-** बावपूर, ठाना/जिल्हा कालियॉ, राज्य नराईल, देश - बांग्लादेश यांना शिताफीने ताब्यात घेतले. सदरचे इसम अतिशय सराईत असल्याने त्यांचेकडे कौशल्यपुर्ण चौकशी केल्यानंतर त्यांनी खारघर सेंट्रल पार्क जवळचे येथील ISKCON मंदिरातील तिन दानपेटीतील रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिल्याने व त्यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.
- सदर गुन्हयाचे तपासामध्ये अटक आरोपींना एकुण ७ दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजूर झाला असून तपासामध्ये ८० हजार रोख रक्कम व गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेले हत्यारे असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.
- तसेच, सदर गुन्हयाचे तपासामध्ये नमुद दोन्ही अटक आरोपी हे बांग्लादेशी नागरीक असल्याचा संशय आल्याने त्यांना विश्वासात घेवून त्याचेकडे विचारपूस केली असता, ते दोघेही ठाना/जिल्हा कालियॉ, राज्य नराईल, देश - बांग्लादेश येथिल मुळचे रहीवाशी असल्याचे तसेच, त्यांचे आई वडील बहिन, भाउ हे मुळ गावी बांग्लादेश येथे राहण्यास असल्याचे तसेच, बांग्लादेश - पश्चिम बंगाल(भारत) बॉर्डरवरून लपून छपून एजंट मार्फत भारतात आल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. **त्यावरुन त्यांच्यावर पासपोर्ट अधिनियम १९५०, विदेशी नागरीकांचा कायदा १९४६ तसेच विदेशी नागरीकांचे आदेश १९४८ मधील नमुद कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे.**
- सदरचे आरोपी हे मंदिरातील चोरी व घरफोडी चोरी करण्यात सराईत असून त्यांचेविरुध्द यापुर्वी एम.एच.बी.कॉ. पो.स्टे.मुंबई, कोपरखैरणे पो.ठाणे, नवी मुंबई तसेच, अहमदाबाद गुजरात

येथील वटवा पो.ठाणे, नारोल पो.ठाणे व सायन्ससिटी पो.ठाणे गुन्हे दाखल असून त्यामध्ये ते अटकेत होते.

- **सदरची उल्लेखनीय कामगिरी मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले, सहा. पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे, व पोलीस अमलदार नितीन जगताप, मंगेश वाट, किरण राउत, प्रकाश साळुंखे, विजय खरटमोल, राहुल वाघ व लक्ष्मण कोपरकर यांनी केलेली आहे.**

- **वर नमुद अटक आरोपी हे मंदीर चोरी व इतर घरफोडी चोरीचे गुन्हयात सराईत असून त्यांना दि.२१/०२/२०२२ रोजी न्यायालयीन कस्टडी मंजूर झालेली आहे. तरी नमुद अटक आरोपी हे आपले पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हयात पाहिजे आरोपी असल्यास तपासी अधिकारी :- सपोनि/जी.डी.देवडे, मध्यवर्ती कक्ष, गुन्हेशाखा, नवी मुंबई मो.नं.९४२७६३६५८ यांचेशी संपर्क साधावा.**

**-----ooo-----**